हम्पीला नमवत भारताची पहिली विश्वचषक विजेती ठरण्याचा मान

नागपूरकर दिव्याची विश्वभरारी

पीटीआय, बतुमी (जॉर्जिया)

नागपूरच्या दिव्या देशमुखने स्वप्नवत कामगिरी करताना महिला विश्वचषक बुद्धिबळ स्पर्धा जिंकणारी पहिली भारतीय ठरण्यासह प्रतिष्ठेचा 'ग्रँडमास्टर' किताबही मिळवला. दोन पिढ्यांमधील लढत ठरलेल्या विश्वचषक बुद्धिबळ स्पर्धेच्या अंतिम फेरीत १९ वर्षीय दिव्याने आपल्यापेक्षा दुप्पट वय असलेल्या 'ग्रँडमास्टर' कोनेरू हम्पीवर 'टायब्रेकर'मध्ये मात केली.

अंतिम फेरीतील शनिवारी आणि रविवारी झालेले दोन पारंपरिक डाव बरोबरीत सुटल्यानंतर 'लोकसत्ता तरुण तेजांकित' पुरस्कार विजेत्या दिव्याने जलद 'टायब्रेकर'मध्ये विजय नोंदवला. सोमवारी 'टायब्रेकर'मधील पहिला डाव बरोबरीत सुटला. मात्र, दुसऱ्या डावात काळ्या मोहऱ्यांनी खेळताना दिव्याने दोन वेळा जागतिक जलद (रॅपिड) प्रारूपातील विजेती असलेल्या हम्पीला पराभवाचा धक्का दिला. दिव्याने एकूण २.५-१.५ असा विजय साकारला.

बुद्धिबळविश्वातील भारताची मक्तेदारी या स्पर्धेने पुन्हा एकदा अधोरेखित केली. गतवर्षी भारताच्या दोम्माराजू गुकेशने विश्वविजेतेपद मिळवले होते. पाठोपाठ दिव्याने आता विश्वचषक स्पर्धेत यश मिळवत आपल्यातील अलौकिक गुणवत्ता सिद्ध केली. दिव्या आणि हम्पी या दोन भारतीयांमध्येच अंतिम लढत झाली हे विशेष.

दिव्याने ही स्पर्धा जिंकत 'ग्रँडमास्टर' किताबही मिळवला. हा किताब मिळवणारी ती भारताची एकूण ८८वी, तर हम्पी, द्रोणावल्ली हरिका आणि आर. वैशाली यांच्यानंतर चौथी महिला बुद्धिबळपटू ठरली. हम्पी २००२ मध्ये 'ग्रँडमास्टर' झाली, तर दिव्याचा जन्म २००५ चा. विश्वचषकाची अंतिम फेरी गाठताच दिव्या आणि हम्पी यांनी पुढील वर्षी होणाऱ्या 'कँडिडेट्स' स्पर्धेतील आपले स्थान निश्चित केले होते.

विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत आपल्याहून कितीतरी पटीने अनुभवी असलेल्या हम्पीवर विजय मिळवल्यानंतर दिव्या भावूक झाली आणि तिला अश्रू अनावर झाले. हम्पीने दिव्याकडून पराभूत होण्यापूर्वी चांगला संघर्ष केला. मात्र, दुसऱ्या 'टायब्रेकर'मध्ये पांढऱ्या मोहऱ्यांनी खेळताना केलेल्या चुका हम्पीला महागात पडल्या. 'टायब्रेकर'मधील पहिल्या डावात 'पेट्रॉफ डिफेन्स' पद्धतीचा अवलंब करताना दिव्याने हम्पीला चांगल्या स्थितीत येण्याची संधी दिली. मात्र, हम्पीकडून चूक झाली आणि अशा स्थितीत दिव्याच्या वजिराविरुद्ध तिच्याकडे एक हत्ती, उंट आणि एक प्यादे होते. अखेर हम्पीने हा डाव बरोबरीत सोडवण्यात यश मिळवले. दुसऱ्या डावात हम्पीने 'कॅटलान' ओपनिंगचा वापर केला आणि दिव्याही यासाठी चांगल्या पद्धतीने तयार होती. हम्पीने ४०व्या चालीत आपल्या प्याद्याला गमावत आक्रमक पवित्रा घेतला. मात्र, दिव्याला फारशी अडचण झाली नाही. हम्पीकडे वेळेची कमतरता होती आणि तिने पुन्हा चूक केल्याने दिव्या विजय मिळवण्याच्या स्थितीत आली. ही संधी साधत दिव्याने इतिहास घडवला.

आंतरराष्ट्रीय मास्टर ते ग्रँडमास्टर...

- दिव्याने नजीकच्या काळात आपल्या कामगिरीने सर्वांचे लक्ष वेधले. विश्वचषक स्पर्धेत सहभागी होण्यापूर्वी दिव्या 'आंतरराष्ट्रीय मास्टर' होती. तिच्याबरोबरच्या हम्पी, वैशाली आणि हरिका या ग्रँडमास्टर होत्या.
- विश्वचषकातील चौथ्या फेरीत दिव्याने द्वितीय मानांकित चीनच्या झू जिनेरला नमवले होते. उपांत्यपूर्व फेरीत तिने भारताची ग्रँडमास्टर हरिकावर ३-१ अशी मात केली. मग उपांत्य फेरीत चीनच्या माजी जगज्जेत्या टॅन झोंगयीचा दोन पारंपरिक डावांअंती १.५-०.५ असा पराभव केला.
- ग्रँडमास्टर होण्यासाठी खेळाडूंना तीन निकष (नॉर्म) पूर्ण करावे लागतात. यासह खेळाडूला पारंपरिक प्रकारात २५०० किंवा त्याहून अधिक एलो गुण मिळवावे लागतात.
- काही महत्त्वाच्या स्पर्धा जिंकल्यानंतरही खेळाडू 'ग्रँडमास्टर' किताब मिळवू शकतो. यामध्ये 'फिडे' महिला विश्वचषकाचाही समावेश आहे. दिव्याने ही स्पर्धा जिंकत 'ग्रँडमास्टर' किताब मिळवला.

दिव्याची कारकीर्द

- **२०२०** : ऑलिम्पियाडच्या सुवर्णपदक विजेत्या संघाची सदस्य
- **२०२१** : आंतरराष्ट्रीय मास्टर
- **२०२२** : 'इंडियन चेस' स्पर्धेत जेतेपद
- **२०२२** : बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये वैयक्तिक कांस्यपदक
- **२०२३** : आशियाई बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेचे जेतेपद
- **२०२३** : टाटा स्टील बुद्धिबळ स्पर्धेच्या जलद (रॅपिड) गटात पहिली
- **२०२४** : शारजा चॅलेंजर्स स्पर्धेचे विजेतेपद
- **२०२४** : युवा जागतिक बुद्धिबळ विजेती
- **२०२४** : ऑलिम्पियाडमध्ये सांघिक आणि वैयक्तिक सुवर्ण
- **२०२५** : महिला विश्वचषक जेतेपदासह 'ग्रँडमास्टर' किताब

फिडे महिला विश्वचषक जिंकून इतिहास रचल्याबद्दल नागपूरच्या दिव्या देशमुख हिला मनःपूर्वक शुभेच्छा. हे महाराष्ट्रासाठी एक असामान्य यश असून संपूर्ण भारतासाठी गौरवाची गोष्ट आहे. तिची एकाग्रता आणि जिद्द या गुणांमुळे असंख्य नवोदितांना प्रेरणा मिळेल.
- नितीन गडकरी, केंद्रीय मंत्री.

विश्वचषक जिंकणारी पहिली भारतीय महिला बुद्धिबळपटू ठरलेल्या दिव्या देशमुखला माझ्याकडून शुभेच्छा. तिने वयाच्या १९व्या वर्षी ही कामगिरी केली आहे. स्पर्धेच्या अंतिम फेरीत दोन्ही खेळाडू या भारताच्या होत्या. यावरून आपल्या देशातील, विशेषतः महिलांमधील प्रतिभा दिसून येते.
- द्रौपदी मुर्मू, राष्ट्रपती.

दोन उत्कृष्ट भारतीय बुद्धिबळपटूंमध्ये ऐतिहासिक अंतिम फेरी. 'फिडे' महिला विश्वचषकाचे जेतेपद मिळवणाऱ्या दिव्या देशमुखचा मला अभिमान आहे. तिचे अभिनंदन. ही कामगिरी अनेक युवा खेळाडूंना प्रेरित करेल. दोन्ही खेळाडूंना भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा.
- नरेंद्र मोदी, पंतप्रधान.

महिला बुद्धिबळ विश्वचषकावर नाव कोरून ग्रँडमास्टर दिव्या देशमुखने भारताची मान गौरवाने उंचावली आहे. राज्याची पहिली महिला ग्रँडमास्टर म्हणून महाराष्ट्राचे नाव बुद्धिबळाच्या आंतरराष्ट्रीय पटावरही सुवर्णाक्षरांनी नोंदवले आहे. या कामगिरीसाठी महाराष्ट्राच्यावतीने दिव्या देशमुखचे मनःपूर्वक अभिनंदन.
- देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री

औद्योगिक उत्पादन वाढीला पाचर

जूनमध्ये अवघ्या १.५ टक्के दराची नोंद

पीटीआय, नवी दिल्ली

खाणकाम आणि वीजनिर्मिती क्षेत्रांच्या बिघडलेल्या कामगिरीमुळे सरलेल्या जून महिन्यांत भारताची औद्योगिक उत्पादन वाढ १० महिन्यांच्या नीचांकी म्हणजेच अवघी १.५ टक्के नोंदवली गेल्याचे सोमवारी जाहीर झालेल्या अधिकृत आकडेवारीने स्पष्ट केले. ऑगस्ट २०२४ नंतरचा हा उत्पादन वाढीचा नीचांकी दर असून, विशेषतः महिन्याच्या उत्तरार्धात झालेल्या अतिवृष्टीतून साधलेला हा प्रतिकूल परिणाम आहे.

देशाच्या कारखानदारी क्षेत्राचे आरोग्यमान हे औद्योगिक उत्पादन निर्देशांकांतून (आयआयपी) च्या दरमहा मोजले जाते. गेल्या वर्षी याच महिन्यांत म्हणजेच जून २०२४ मध्ये त्यात ४.९ टक्क्यांची वाढ दिसून आली होती. राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने (एनएसओ) जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, मे २०२५ मध्ये औद्योगिक उत्पादन वाढीचा वेग १.९ टक्के होता. जो आधी जाहीर करण्यात आलेल्या १.२ टक्क्यांच्या अंदाजाच्या तुलनेत सुधारून घेत वाढविण्यात आला आहे.

जूनच्या उत्तरार्धात झालेल्या अतिवृष्टीचा खाण उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता होतीच. शिवाय वीज निर्मितीतही घट झाली, ती जरी आधीच्या महिन्याच्या तुलनेत कमी असली तरी या कारणामुळे ती झाली, असे 'इक्रा'च्या मुख्य अर्थतज्ज्ञ आदिती नायर म्हणाल्या.

उपलब्ध आकडेवारीनुसार, निर्मिती क्षेत्राची उत्पादन वाढ जून २०२५ मध्ये किरकोळ वाढीसह ३.९ टक्क्यांवर पोहोचली आहे, जी मागील वर्षी याच महिन्यांत ३.५ टक्क्यांच्या पातळीवर होती. खाण उत्पादन ८.७ टक्क्यांनी आक्रसले आहे, ज्यात गेल्या वर्षी याच महिन्यांत १०.३ टक्के वाढ दिसून आली होती. वीजनिर्मितीत २.६ टक्क्यांनी घट झाली, जी गेल्या वर्षी ८.६ टक्क्यांनी वाढली होती. जून २०२५ मध्ये पायाभूत सुविधा/बांधकाम क्षेत्रात ७.२ टक्के वाढ नोंदवली गेली, जी मागील वर्षीच्या याच महिन्यांतील ८.२ टक्के वाढीपेक्षा कमी आहे. प्राथमिक वस्तूंचे उत्पादन ३ टक्क्यांनी घटले आहे, जे गेल्या वर्षी ६.३ टक्के पातळीवर होते.

अमेरिकेशी व्यापार-कराराबाबत अनिश्चिततेतून 'सेन्सेक्स'ची सलग घसरण

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

मुंबई : भारत-अमेरिका दरम्यान व्यापार करार १ ऑगस्टच्या अंतिम मुदतीपूर्वी मार्गी लागण्याची शक्यता कठीण बनल्याच्या चिंतेने भांडवली बाजारात गुंतवणूकदारांना नकारात्मकतेने घेरले असून, सलग तिसऱ्या सत्रात सेन्सेक्स-निफ्टी या प्रमुख निर्देशांकांत परिणामी घसरण झाली. अमेरिकी प्रशासनाने रविवारी, १ ऑगस्टची अंतिम मुदत आणखी वाढवली जाणार नसल्याचे संकेत दिल्याने गुंतवणूकदारांवरील ताण वाढला.

आठवड्याची सुरुवात बाजारातील नकारात्मक भावना, उच्च पातळीवर समभागांमध्ये विक्रीचा दबाव कायम राहिला. परिणामी सोमवारी दिवसअखेरीस, सेन्सेक्स ५७२.०७ अंशांनी ८०,८९१.०२ अंशांवर बंद झाला. तर निफ्टी १५६.१० अंशांच्या नुकसानीसह २४,६८०.९० पातळीवर दिवसअखेर स्थिरावला.

जिओजित इन्व्हेस्टमेंट्स लिमिटेडचे संशोधन प्रमुख विनोद नायर म्हणाले की, पहिल्या तिमाहीतील निराशाजनक कामगिरी, भारत-अमेरिका व्यापार कराराला अपेक्षेपेक्षा अधिक विलंब आणि विदेशी गुंतवणुकीने निरंतर धरलेला बाहेरचा रस्ता यामुळे देशांतर्गत बाजाराने एकंदर गुंतवणुकीचे चैतन्य गमावले, बाजार भावना सावध बनल्या आहेत.

संपदा सहकारी बँक लि., पुणे

मुख्य कार्यालय : ७१७, बुधवार पेठ, डी.आय.सी.बिल्डिंग, पुणे ४११ ००२
फोन : (०२०) ४०३९४०३७, ४०३९४०४६, ४०३९४०२०
ई-मेल: headoffice@sampadabank.com | वेबसाईट: www.sampadabank.com

स्थावर मालमत्तेचा ताबा नोटीस
नियम ८ (१) नुसार

ज्याअर्थी, संपदा सहकारी बँक लि., पुणे, सहभाग कर्ज योजनेची प्रमुख बँक म्हणून कार्यरत असून जनता सहकारी बँक लि., पुणे, ही सदस्य आहे. ज्याअर्थी प्रमुख बँक म्हणून संपदा सहकारी बँक लि., पुणे यांचे अधिकृत अधिकारी यांनी सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ चे कलम १३(१२) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट नियम २००२ चे नियम ३ चे नुसार प्राप्त झालेल्या अधिकारान्वये सहभाग कर्ज योजनेतील सदस्यांच्या वतीने **कर्जदार मे. ओम साई जॅगरी इंडस्ट्रीज (भागीदारी संस्था) चे वतीने प्रतिनिधीत्व करणारे भागीदार, गहाणखतदार व जामीनदार (१) श्री. श्रीपाद ज्ञानदेव कवाष्टे, (२) श्री. शरद कुंडलिक पवार, (३) श्री. दिपक विठ्ठल कवाष्टे, (४) सौ. संगिता श्रीपाद कवाष्टे, आणि जामीनदार (१) श्री. शिवानंद भिमू मगदूम, (२) श्री. कैलास भूताजी बोरसे** यांना दि. १९.०८.२०२२ रोजी मागणी नोटीस पाठविली होती. सदर नोटीसीमध्ये दि.३१.०७.२०२२ रोजीची येणेबाकी रक्कम **रु.२,८०,०७,००९.८१ पै. (रुपये दोन कोटी ऐंशी लाख सात हजार नऊ, पैसे एक्क्याऐंशी फक्त)** अधिक दि.०१.०८.२०२२ पासून पुढील व्याज, खर्च व इतर शुल्क इ.ची सदर नोटिशीचे तारखेपासून ६० दिवसांचे आत भरणा करण्याची मागणी केली होती.

वर नमूद केलेल्या कर्जदार व जामीनदार हे बँकेची रक्कम परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने सहभाग कर्ज योजनेतील सदस्यांच्या वतीने खाली सही करणार अधिकृत अधिकारी यांनी सदर कायद्याच्या कलम १३च्या उपकलम ४ नुसार सोबतच्या सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट नियम २००२ च्या नियम क्र. ८ अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मे.जिल्हाधिकारी, जि.अहिल्यानगर (अहमदनगर) यांचेकडून जावक क्रे डी.सी./एस.आर./सिक्यु केस क्रं /३३६/२०२४ दि.१५/०१/२०२५ चे आदेशानुसार व कर्जदार यांचे दिनांक १५/०७/२०२५ रोजीच्या पत्रानुसार खाली वर्णन केलेल्या स्थावर मालमत्तेचा दि. १८/०७/२०२५ रोजी प्रत्यक्ष ताबा घेतला आहे. ताबा नोटिसांच्या प्रती मालमत्तेच्या ठळक आणि प्रमुख ठिकाणी चिटकविण्यात आल्या आहेत.

वर नमूद केलेल्या कर्जदार व जामीनदार आणि सर्वसामान्य जनता यांना जाहीर सावधानतेची सूचना देण्यात येते की, त्यांनी खाली उल्लेख केलेल्या स्थावर मालमत्तेसंबंधात कोणतेही व्यवहार करु नयेत. जर असा कोणताही व्यवहार केला गेला तर तो सहभाग कर्ज योजनेतील प्रमुख बँक संपदा सहकारी बँक लि., पुणे आणि सदस्य बँक जनता सहकारी बँक लि., पुणे यांची येणे असलेली रक्कम रुपये २,८०,०७,००९.८१ पै. (रुपये दोन कोटी ऐंशी लाख सात हजार नऊ, पैसे एक्क्याऐंशी फक्त) अधिक दि.०१.०८.२०२२ पासून पुढील व्याज, खर्च व इतर शुल्क इ. बोजासह असेल याची नोंद घ्यावी.

स्थावर मालमत्तेचे वर्णन

ओम साई जॅगरी इंडस्ट्रीज् चे भागीदार श्री. श्रीपाद ज्ञानदेव कवाष्टे यांचे मालकीची स्थावर मालमत्ता

१) सहभाग कर्ज योजनेतील सभासद बँकांचा पारीपासू बोजा असलेली मौजे येळपणे, ता. श्रीगोंदा. जि. अहमदनगर येथील गट नं. १३/१ मधील भूखंड क्षेत्रफळ ४० आर. यावर बांधण्यात आलेली डेअरी शेड व ऑफिस अंदाजे क्षेत्रफळ १,००० चौ. फू. आणि गुळ उत्पादनासाठी बांधण्यात आलेले शेड अंदाजे क्षेत्रफळ १०,००० चौ. फू.

२) सहभाग कर्ज योजनेतील सभासद बँकांचा पारीपासू बोजा असलेली मौजे येळपणे, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर येथील गट नं. १३/१ मधील भुखंड क्षेत्रफळ ४० आर. यावर गुळ उत्पादनासाठी बांधण्यात आलेले शेड अंदाजे क्षेत्रफळ १०,००० चौ.फू. अधिक १० खोल्या.

सही/-
(सिल)
गिरीश गणेश सरदेशपांडे
अधिकृत अधिकारी
सरफेसी कायदा बँक लि.,पुणे
संपदा सहकारी बँक लि.,पुणे
सहभाग कर्ज योजनेतील सभासदाच्या वतीने

दिनांक : १८/०७/२०२५
ठिकाण : येळपणे,
जि.अहमदनगर

निडो होम फायनान्स लिमिटेड

nido HOME FINANCE

(पूर्वीची एडलवाईस हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात असलेली) नोंदणीकृत कार्यालय : ५वा मजला, टॉवर ३, विंग "बी", कोहिनूर सिटी मॉल, कोहिनूर सिटी, किरोल रोड, कुर्ला (प), मुंबई-४०००७०. प्रादेशिक कार्यालय : ऑफिस नं. ४०७-४१०, चौथा मजला, काकडे बीझ आयकॉन, सीटीएस नं. २६८७बी, गणेशखिंड रोड, भाम्बुर्डे, शिवाजी नगर, पुणे-४११०१६, महाराष्ट्र.

ई-लिलाव - ३० दिवसीय सांविधिक विक्रि सूचना

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ अंतर्गत ई-लिलावाद्वारे विक्रि.

आम जनतेस आणि विशेषकरून ऋणको व हमीदारांना याद्वारा सूचना देण्यात येते की, याखाली नमूद केलेल्या मालमत्तेची विक्रि कर्ज देणींच्या वसूलीपर्यंत जोडलेल्या तालिकेत नमूद केल्यानुसार रकमेच्या वसूलीकरिता **"जसे आहे जेथे आहे", जसे आहे जे काही आहे" व "जे काही आहे तेथे आहे"** या तत्वावर करण्यात येणार आहे. उक्त मालमत्ता **"मेसर्स निडो होम फायनान्स लिमिटेड"कडे (पूर्वीची एडलवाईस हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात असलेली)** ऋणको, सह-ऋणको व हमीदाराद्वारा लाभ घेतलेल्या कर्जाकरिता गहाण ठेवण्यात आली आहे. सुरक्षित धनकोंनी याखाली नमूद केलेल्या सुरक्षित मत्तेचा प्रत्यक्ष ताबा घेतला आहे.

अ. क्र	अनु क्र. ऋणको / सह-ऋणको / हमीदाराचे नाव	वसूलीची रक्कम	राखीव किंमत व इरठे	लिलावाची तारीख व वेळ
1	१. जयश्री सुरेश तोरडमल (ऋणको) व सुरेश साहेबराव तोरडमल (सह-ऋणको)	रु. २८,४६,१९७/- (रुपये अठ्ठावीस लाख शेहेचाळीस हजार एकशे सत्याण्णव फक्त) २६.०७.२०२५ रोजी प्रमाणे + त्यावरील पुढील व्याज + विधि खर्च - एलएएन नं. : LAMESTH0000098452 करिता	रु. २८,३९,७१९/- (रुपये अठ्ठावीस लाथ एकोणचाळीस हजार सातशे एकोणीस फक्त) इसारा रक्कम ठेव: रु. २,८३,९७१/- (रुपये दोन लाख त्र्यॅएंशी हजार नवशे एकाहत्तर फक्त)	११-०९-२०२५ - स. ११.०० व दु. १२.०० दरम्यान (५ मिनिटांच्या अमर्यादित स्वयं-विस्तारासह)
पाहाणीची तारीख व वेळ : ०५-०८-२०२५ - स. ११.०० व दु. ०३.०० दरम्यान			प्रत्यक्ष ताबा तारीख : २१-०६-२०२५	

सुरक्षित मत्तेचे वर्णन : पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे - धारण केलेला पूर्व बाजूचा रो हाऊस नं. ३, प्लॉट एरिआ मोजमापाचा ५१.५० चौ.मी., त्यावरील संपूर्ण बांधकामासहीत, धारण केलेला सर्व्हे नं. २८९/१ए, प्लॉट नं. ७ यापैकी बांधकाम केलेले व येथे स्थित - मौजे नगरदेवळे, अहमदनगर जिल्हा परिषदेच्या मर्यादित. **उक्त मालमत्ता पुढीलप्रमाणे सिमित : पूर्व :** रो हाऊस नं. १, **पश्चिम :** रो हाऊस नं. २, **दक्षिण :** रोड, **उत्तर :** सुविधा.

नोंदी : १) लिलाव विक्रिचे आयोजन **https://sarfaesi.auctiontiger.net** या वेबसाइटद्वारा ऑनलाईन करण्यात येणार आहे आणि ज्या बोलीदारांकडे वैद्य ईमेल, आयडी पुरावा व फोटो पुरावा, पॅन कार्ड आहे आणि ज्यांनी डिमांड ड्राफ्ट / एनईएफटी / आरटीजीएसद्वारा इरठेचे यथोचितरीत्या प्रदान केलेले आहे तेच केवळ या **"ऑनलाईन ई-लिलावा"**त सहभागी होण्यास पात्र असणार आहेत.
२) **स्वारस्य असलेल्या बोलीदारांनी त्यांची इरठे डिमांड ड्राफ्ट/आरटीजीएस/एनईएफटीद्वारा सादर करण्याचा मार्ग : लाभाधिकारीचा नाव: निडो होम फायनान्स लिमिटेड, बँक: स्टेट बँक ऑफ इंडिया, अकाउंट नं.: ६५२२६८४५१९९, सरफेसी-ऑक्शन, निडो होम फायनान्स लिमिटेड, आयएफएससी कोड: SBIN0001593.**
३) **इरठेसमवेत बोली प्रपत्रे ऑनलाईन सादरीकरणाकरिता शेवटची तारीख १०-०९-२०२५ आहे.**
४) विक्रिच्या सविस्तर शर्ती व अटींकरिता, कृपया **https://sarfaesi.auctiontiger.net या वेबसाइटला भेट द्यावी किंवा कृपया संपर्क साधावा : श्री. मौलिक श्रीमाली, फोन : +९१-६३५१८९६६४३/९१७३५२८७२७, हेल्प लाईन ईमेल आयडी : Support@auctiontiger.net**

मोबाईल नं. : ७४००११०३३९ / ७४००११३२८७ / ८९५६५५४४७७ — **स्वाक्षरी/-प्राधिकृत अधिकारी**
दिनांक : २९.०७.२०२५ — **निडो होम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची एडलवाईस हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात असलेली)**

जेएम फायनॅन्शिअल होम लोन्स लिमिटेड

JM FINANCIAL HOME LOANS

कॉर्पोरेट कार्यालय: तिसरा मजला, सुआशिष आयटी पार्क, प्लॉट क्र. 68-ई, दत्त पाडा रोडच्या पलिकडे,टाटा स्टीलसमोर,बोरीवली (पूर्व), मुंबई - 400066.

कर्जदार व आम जनतेसाठी विक्रीची सूचना

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (सर्फेसी) ॲक्ट, 2002 अंतर्गत जेएम फायनॅन्शिअल होम लोन्स यांचेकडे भाग्रस्त असलेल्या स्थावर व जंगम मत्तांची विक्री.

जेएम फायनॅन्शिअल होम लोन्स लिमिटेड (जेएमएफएचएलएल) चे प्राधिकृत अधिकारी म्हणून निम्नस्वाक्षरीकारांनी सर्फेसी अधिनियमातील अनुच्छेद 13(4) अंतर्गत खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा ताबा घेतलेला आहे.

कर्जदार / सह-कर्जदारांनी सदर सूचनेच्या दिनांकापासून 30 दिवसांचे आत संपूर्ण थकबाकी रकमेचा भरणा न केल्यास जेएमएफएचएलएल हे सर्फेसी अधिनियमातील तरतुदींतर्गत सदर मालमत्तेची विक्री करण्यास स्वतंत्र असतील.

याद्वारे सर्व लोकांना सूचित करण्यात येते की खाली नमूद अनामत मालमत्ता ''जशी आहे जेथे आहे'' आणि ''जशी आहे जे काही आहे'' आणि ''तेथे जे काही आहे'' तत्त्वावर जेएमएफएचएलएल च्या थकबाकीच्या वसुलीसाठी कंपनीस मान्य असणाऱ्या अटींनुसार सर्फेसी अधिनियम, 2002 आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील तरतुदींतर्गत विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

कर्जाचे तपशील:

कर्जदार, सह-कर्जदार, जामीनदाराचे नाव, कर्ज खाते क्रमांक	या दिनांकास कर्जाची थकबाकी रक्कम	तारण मालमत्तेचे तपशील
1. श्री सुग्रीव रामलक्ष्मण कुमार 2. श्रीमती दुर्गावती सुग्रीव कुमार कर्ज खाते क्रमांक: HANG24000055113	09-जाने-2025 रोजी थकबाकी रु. 18,56,837/- (रुपये अठरा लक्ष छपन्न हजार आठशे सदतीस फक्त)	''बी.के. हाईट्स'', पहिला मजा, सदनिका क्र. 102, चटई क्षेत्रफळ सुमारे 38.26 चौ.मी., बाल्कनीचे क्षेत्रफळ सुमारे 5.40 चौ.मी., जिना + लॉबीचे क्षेत्रफळ सुमारे 4.44 चौ.मी., एकूण चटई क्षेत्रफळ सुमारे 48.10 चौ.मी., प्लॉट क्र. 29, प्लॉटचे एकूण क्षेत्रफळ सुमारे 303.75 चौ.मी., सर्वे क्र. 27, केडगाव, ता. नगर, जि. अहमदनगर आणि अहमदनगर महानगर पालिकेच्या स्थानिक हद्दीत, अहमदनगर, महाराष्ट्र, पिन कोड - 414005. सदर मालमत्तेच्या चतुःसीमाः पूर्वेस - सर्वे क्र. 16, दक्षिणेस - प्लॉट क्र. 30, पश्चिमेस - सर्वे क्र. 28, उत्तरेस - प्लॉट क्र. 20 व रस्ता. सदर मालमत्तेच्या चतुःसीमाः सदनिकाः पूर्वेस - सदनिका क्र. 103 व पॅसेज, दक्षिणेस - मोकळे आकाश, पश्चिमेस - मोकळे आकाश, उत्तरेस - सदनिका क्र. 101.

खाजगी वाटाघाटीच्या माध्यमातून मालमत्तेच्या विक्रीसाठी सामान्य अटी व शर्ती खालीलप्रमाणे:

1. विक्री ही खाजगी वाटाघाटीच्या माध्यमातून ''जशी आहे जेथे आहे'' ''जशी आहे जे काही आहे'' आणि ''तेथे जे काही आहे'' तत्त्वावर घेण्यात येईल.
2. खरेदीदारास बँकेने मालमत्तेच्या खरेदीसाठी प्रस्ताव स्वीकारल्यानंतर पुढील **कामकाजाच्या दिवशी विक्री रकमेपैकी 25% एवढ्या रकमेचा भरणा करावा लागेल** आणि उर्वरित रकमेचा भरणा त्यानंतर **15 दिवसांच्या आत** करावा लागेल.
3. खरेदीदारास अर्जासोबत प्रस्ताव रकमेच्या 10% एवढ्या रकमेचा भरणा करावा लागेल आणि ही रक्कम वरील कलम (2) नुसार करण्यात येणाऱ्या 25% एवढ्या भरण्यात समायोजित करण्यात येईल.
4. वरील कलम (2) अंतर्गत आवश्यक असल्यानुसार रकमेचा भरणा न केल्यास अर्जासोबत जमा केलेल्या 10% रकमेसोबत तोवर भरलेल्या सर्व रकमा जप्त करण्यात येतील.
5. जेएमएफएचएलएल द्वारे खरेदीदाराचा प्रस्ताव स्वीकारण्यात न आल्यास अर्जासोबत जमा करण्यात आलेली 10% रक्कम कोणत्याही व्याजाशिवाय परत करण्यात येईल.
6. सदर मालमत्तेची विक्री जेएमएफएचएलएल यांना ज्ञात किंवा अज्ञात अशा सर्व वर्तमान व भावी बोज्यांसह करण्यात येत आहे. तिसरया पक्षाने दावे/ अधिकारांची / थकबाकीची मागणी केल्यास त्यासाठी प्राधिकृत अधिकारी / सुरक्षित धनको जबाबदार नसतील.
7. खरेदीदाराने (खाजगी वाटाघाटीच्या माध्यमातून विक्रीतर्गत) मालमत्तेशी संबंधित सर्व बाबींचे काळजीपूर्वक परीक्षण करून स्वतःची खात्री करून घ्यावी. पुढे या संदर्भात प्राधिकृत अधिकारी / सुरक्षित धनकोविरुद्ध कोणताही दावा करण्याचा अधिकार खरेदीदारास नसेल.
8. कुठलेही कारण न देता खरेदीचा कोणताही प्रस्ताव फेटाळण्याचा अधिकार जेएमएफएचएलएल राखून ठेवतात.
9. एकाहून अधिक प्रस्ताव प्राप्त झाल्यास जेएमएफएचएलएल द्वारे सर्वोच्च प्रस्ताव स्वीकारण्यात येईल.
10. अधिक तपशील / खुलाशासाठी आणि आपला अर्ज सादर करण्यासाठी इच्छुक प्राधिकृत अधिकारयांशी संपर्क साधू शकतात.
11. मालमत्तेच्या खरेदीशी संबंधित मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क, आणि इतर खर्च, कर, थकबाकी इ. चा खर्च खरेदीदारास करावा लागेल.
12. विक्री ही सर्फेसी अधिनियम/ नियमातील तरतुदींच्या अनुषंगाने करण्यात येईल.
13. कर्जदाराने जेएमएफएचएलएल यांचेशी संपर्क साधून थकबाकी रकमेचा भरणा केल्यास जेएमएफएचएलएल यांना सदर व्यवहार रद्द करावा लागेल आणि ते संभाव्य खरेदीदारास विक्रीची रक्कम परत करतील.
14. **प्राधिकृत अधिकारयांचे तपशील - श्री किशोर जगताप संपर्क - 8850487119 मेल: kishor.jagtap@jmfl.com**

दिनांक: 29/07/2025 — **जेएम फायनॅन्शिअल होम लोन्स लिमिटेड करिता**
स्थान: महाराष्ट्र — **स्वा/- प्राधिकृत अधिकारी**

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

रिझर्व्ह बँक द्वारा नियंत्रित संस्थांच्या विरोधातील तक्रारींचे निवारण

रिझर्व्ह बँक - एकीकृत ओम्बड्समैन योजना (आरबी-आईओएस)

- रिझर्व्ह बँके द्वारा नियंत्रित सर्व संस्थांना त्यांच्या ग्राहकांकडून प्राप्त झालेल्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी संस्था स्तरावर एक यंत्रणा असणे अनिवार्य केले गेले आहे, जिला संस्थेची अंतर्गत तक्रार निवारण यंत्रणा मानले जाते.
- रिझर्व्ह बँक - एकीकृत ओम्बड्समैन योजना, 2021 (आरबी-आईओएस) च्या माध्यमातून रिझर्व्ह बँकेने आपल्या नियंत्रित संस्थां द्वारा प्रदान करण्यांत येत असलेल्या सेवांमधील कमतरतांशी संबंधित ग्राहकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी एक जलद आणि निःशुल्क पर्यायी तक्रार निवारण यंत्रणा देखील स्थापन केली आहे.
- तक्रार निवारण यंत्रणे अंतर्गत बँका, बिगर-बँकिंग वित्तीय कंपन्या (एनबीएफसी), पेमेंट प्रणाली सहभागी (पीएसपी) आणि क्रेडिट इन्फॉर्मेशन कंपन्या (सीआईसी) यांना नियंत्रित संस्था म्हणून गणले जाते.
- आरबी-आईओएस कोणत्याही नियंत्रित संस्थे विरुद्धच्या सर्व तक्रारींसाठी 'एक राष्ट्र एक ओम्बड्समैन' दृष्टिकोन